MHLA050002302021

## नि.क्र. ५ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश–३९, नियम–१, २ प्रमाणे दाखल करून प्रतिवादी क्र.१ ने भुसंपादनाच्या नुकसानभरपाईची रक्कम प्रतिवादी क्र.२ ला अदा करू नये व दरम्यानच्या काळात जर प्रतिवादी क्र.२ ला रक्कम अदा केली तर प्रतिवादी क्र.२ ने ती रक्कम काढून घेवू नये असा तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. या अर्जास प्रतिवादी क्र. २ याने नि.क्र. २८ वर म्हणणे दाखल केले आहे व अर्जास तीव्र विरोध करुन अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली आहे. प्रतिवादी क्र.१ ने या अर्जास म्हणणे दिलेले नाही.

३. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. वादीचे म्हणणे असे की, वादी व प्रतिवादी क्र.२ यांच्या वडीलोपार्जीत जमीनीपैकी काही जमीन प्रतिवादी क्र.१ यांनी संपादन केली. या जमीनीमध्ये वादीचा अर्धा हिस्सा आहे. वादीचा अर्धा हिस्सा डावलून प्रतिवादी क्र.१ हे नुकसानभरपाईची रक्कम प्रतिवादी क्र.२ यास अदा करण्याच्या प्रयत्नात आहे. या रकमेत वादीचाही अर्धा हिस्सा आहे. असे झाल्यास वादीचे प्रचंड आर्थीक नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ व २ यांच्याविरूध्द तात्पूर्ता मनाई आदेश देण्यात यावा. प्रतिवादी क्र.२ चा युक्तिवाद असा की वादी व प्रतिवादी क्र.२ यांचे वडील हयात

असतांना वादीने या जमीनीतील तिचा हिस्सा सोडून दिलेला होता. त्यामुळे तिला त्या जमीनीत व नुकसानभरपाईच्या रकमेत कसलीही वाटणी मागण्याचा अधिकार नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

४. वादी, प्रतिवादी क्र.२ ची कथने व युक्तीवाद यावरुन खालील मुद्दे उपस्थित होतात. ते मुद्दे त्याच्या निष्कर्षासह खालीलप्रमाणे आहेत.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादीच्या बाजूने दाव्यामध्ये प्रथमदर्शनी परिस्थिती असल्याचे वादीने सिध्द केले आहे का ? | अंशतः होकारार्थी |
| २) | न्यायाचे समतुलत्व वादीच्या बाजुने आहे काय ? | अंशतः होकारार्थी |
| ३) | तात्पुरता मनाई आदेश न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे का ? | अंशतः होकारार्थी |
| ४) | अंतिम आदेश काय ? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

मुद्दे क्र.१ ते ३ बाबत :–

५. मुद्दे क्र.१ ते ३ हे एकमेकांशी निगडीत असल्याने त्यावर एकत्रीत चर्चा करीत आहे.

६. वादीच्या कथनानुसार मौजे थोरलेवाडी ता. अहमदपुर जिल्हा लातूर येथील जमीन गट क्र. १४ ही जमीन वादी व प्रतिवादी क्र.२ यांचे वडील महादू उर्फ माधव आक्कनगिरे यांची वडीलोपार्जीत जमीन आहे. या जमीनीतील ३४आर क्षेत्र

राष्टीय महामार्ग क्र. ३६१ साठी प्रतिवादी क्र.१ ने संपादन केले होते. त्याची नुकसानभरपाई रक्कम रू. ६२,२१,७२१/- निवाडा भु.संपादन प्रकरण क्र. २०१९/भुसंपादन/एनएच-३६१/सीआर-५ दिनांक ३१.८.२०१९ नुसार मंजूर झालेली आहे. प्रतिवादी क्र.१ ती रक्कम प्रतिवादी क्र.२ यास अदा करण्याच्या प्रयत्नात आहे. गट क्र.१४ ही जमीन वडीलोपार्जीत असल्याने त्यामध्ये वादीचा अर्धा हिस्सा आहे. म्हणून संपादनाच्या नुकसानभरपाईच्या रकमेमध्येसुध्दा वादीचा अर्धा हिस्सा आहे.

७. जमीन गट क्र.१४ मध्ये ०७आर जमीन पुर्वी राष्टीय महामार्गासाठीच संपादन झालेली होती. त्याची नुकसानभरपाई रक्कम रू. १८,३४,८५९/- ही निवाडा क्र.भुसंपादन प्रकरण क्र. २०१६/भु.सं./एन.एच.-३६१/सीआर-१९ दिनांक २०.१.२०१८ अन्वये मंजूर झालेली होती. परंतु ती रक्कम प्रतिवादी क्र.१ याने प्रतिवादी क्र.२ यास दिली.

८. जमीन गट क्र.१४ वडीलोपार्जीत जमीन असूनही वादी व प्रतिवादी क्र.२ यांचे वडील महादू अक्कनगिरे यांनी व प्रतिवादी क्र.२ याने वाटणीचा दस्त क्र. २७७५/२०१४ दिनांक २३.९.२०१४ रोजी अस्तीत्वात आणून वादीचा अर्धा हिस्सा डावलून जमीन आपापसात वाटून घेतली. जमीनीतील अर्धा हिस्सा मिळण्यासाठी वादीने दिवाणी दावा क्र. ५८४/२०१९ हा प्रतिवादी क्र.२ व इतर यांच्याविरूध्द दाखल केलेला असून तो प्रलंबीत आहे.

९. वादीने नि.क्र.४ लगत जमीन गट क्र.१४ मधील क्षेत्राच्या संपादनाचे

निवाडे दाखल केले आहेत. वादीने प्रतिवादी क्र.१ कडे प्रतिवादी क्र.२ यास रक्कम देवू नये म्हणून तक्रारी अर्ज दाखल केला होता. त्यावर दिनांक १४.१०.२०२१ रोजी आदेश पारित करून वादीचा तक्रारी अर्ज खारिज केला तो आदेश नि.क्र.१९ यादीलगत वादीने दाखल केलेला आहे.

१०. प्रतिवादी क्र.२ ने त्याच्या म्हणण्यामध्ये गट क्र.१४ ही जमीन वडीलोपार्जीत असल्याचे वादीचे कथन नाकारले आहेत. परंतु त्याने असेही कथन केले आहे की सन १९९४ मध्ये गुढीपाडव्याच्या दिवशी महादू अक्कनगिरे याने केलेल्या तोंडी वाटपावेळी वादीने मिळकतीमधील तिचा हिस्सा प्रतिवादी क्र.२ व साक्षीदारांसमक्ष सोडून दिलेला होता. जर मिळकत वडीलोपार्जीत नसेल तर वादीचा त्यामध्ये हिस्सा आला नसता व तिने तो सोडून देण्याचा प्रश्न उदभवला नसता. त्यामुळे जमीन गट क्र.१४ ही वडीलोपार्जीत आहे असे समजण्यास वाव आहे. जमीन गट क्र.१४ ही महादू अक्कनगिरे याची स्वकष्टार्जीत जमीन असल्याबाबत कागदोपत्री पुरावा प्रतिवादी क्र.२ ने आणलेला नाही.

११. यातील वादीने वाटपासाठी दिवाणी दावा क्र. ५८४/२०१९ हा दाखल केलेला आहे. वादीचा या मिळकतीत व पर्यायाने संपादन केलेल्या क्षेत्रासाठी मिळालेल्या नुकसानभरपाईच्या रकमेत हिस्सा आहे कि नाही हे पुराव्याअंती ठरणार आहे. परंतु प्रथमदर्शनी असे दिसून येते की गट क्र.१४ ही जमीन वडीलोपार्जीत आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी बाब वादीच्या बाजुने आहे. न्यायाचे समतुलत्व वादीच्या बाजुने आहे. त्यामुळे जर प्रतिवादी क्र.१ ने नुकसानभरपाईची रक्कम प्रतिवादी क्र.२ यास अदा केली तर वादीच्या हिश्याची रक्कम तिला मिळण्यापासून ती वंचित राहिल. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यास प्रतिवादी क्र.२ ला रक्कम अदा करण्यापासून रोखणे

आवश्यक आहे. तथापी, असा तात्पूर्ता मनाई आदेश देतांना नुकसानभरपाईच्या रकमेमध्ये प्रतिवादी क्र.२ चा अर्धा हिस्सा आहे हेही विचारात घ्यावे लागेल. त्यामुळे तात्पूर्ता मनाई आदेश देतांना वादीच्या अर्धा हिश्याच्या रक्कमेपुरता देणे योग्य ठरेल. दरम्यानच्या काळात प्रतिवादी क्र.१ याने प्रतिवादी क्र.२ यास रक्कम अदा केली असल्याबाबतचा कोणताही पुरावा प्रतिवादी क्र.२ याने दाखल केलेला नाही. यावरून असे दिसून येते की नुकसानभरपाईची रक्कम आजपर्यंत प्रतिवादी क्र.१ कडे आहे. म्हणून या मुदयांची उत्तरे मी अंशतः होकारार्थी देतो.

मुद्दा क्र.४ बाबत :–

१०. मुद्दे क्र.१ ते ३ यांच्या निष्कर्षावरुन असे दिसते की, वादीने तिचा अर्ज अंशतः सिध्द केलेला आहे व तो अंशतः मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील आदेश देतो.

## आ दे श

१) मौजे थोरलेवाडी ता. अहमदपुर येथील जमीन गट क्र.१४ मधील ३४आर जमीनीच्या संपादनाच्या नुकसानभरपाई रक्कम रू. ६२,२१,७२१/– पैकी वादीच्या अर्ध्या हिश्याची रक्कम प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ यास या दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत अदा करू नये असा तात्पूर्ता मनाई आदेश दिलेला आहे.

२) दरम्यानच्या काळात प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ यास संपूर्ण रक्कम अदा केली असेल तर प्रतिवादी क्र.२ ने त्यातील अर्धी रक्कम त्याच्या बॅक खात्यातून काढून घेवू नये असा तात्पूर्ता मनाई आदेश या दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत दिलेला आहे.

.

३) या अर्जाचा खर्च दाव्याच्या खर्चात समाविष्ट राहील.

Digitally signed by PRASAD ANANT SAVADIKAR
Date: 2022.07.07 17:45:04 +0530

(प्र.अ. सवदीकर)

दिनांक – ०७.०७.२०२२

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
अहमदपूर